१

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

**जाहिरात व परवाने विभाग**

राजीव गांधी भवन (मुख्यालय), शरणपुररोडनाशिक -४२२ ००२


## - जाहिर सूचना -

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, शिवजयंती, आंबेडकर जयंती, रमझान ईद, मोहरम, नाताळ इत्यादी प्रकारचे विविध उत्सव साजरे केले जातात. सदर सण-उत्सवा दरम्यान तात्पुरता स्वरुपात मंडप उभारण्यासाठी विविध सार्वजनिक मंडळे महानगरपालिकेकडे अर्ज करतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३४ अन्वये पोलीस विभागाच्या सहमतीने मंडप उभारण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी देण्यात येते. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देश / आदेशानुसार तसेच मा. शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सण / उत्सव प्रसंगी उभारणेत येत असलेले तात्पुरता स्वरुपातील मंडप स्टेज, कमान उभारणेस फक्त ऑनलाईन परवानगी देणे संदर्भात दिनांक ०७/०७/२०२० रोजीचे सुधारित परिपत्रक नाशिक महानगरपालिकेची वेब साईट www.nmc.gov.in वर प्रसिध्द करणेत आलेले आहे.

सर्व सणांकरीता तात्पुरता स्वरुपात मंडप बांधण्याकरीता / उभारण्याकरीता परवानगीसाठी अर्ज संबंधित सणाच्या ३० दिवसांपूर्वी नाशिक महानगरपालिकेच्या **http://nmcfest.nmc.gov.in** या वेब साईटवर ऑनलाईन सादर करावा. सणाच्या समारंभाच्या ०७ दिवसापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सार्वजनिक उत्सवाच्या वेळी रस्त्यावर तात्पुरता मंडप उभारण्यास नियमानुसार ऑनलाईन परवानगी वरिल परिपत्रकात नमूद केलेनुसार देण्यात येईल.

आगामी गणेशोत्सव व नवरात्रोत्सव - २०२५ करीता तसेच इतर सण उत्सवाकरीता, सार्वजनिक ठिकाणी तात्पुरता स्वरुपात मंडप / स्टेज, कमान उभारणेची ऑनलाईन परवानगी सर्व संबंधीतांनी नियमानुसार वेळेत घेवून मंडप / स्टेज, कमान उभारावे. तसेच परवानगीचा तपशिल मंडप / स्टेज, कमानीचे दर्शनी भागावर लावण्यात यावा. तसे न केल्यास, मंडप / स्टेज, कमान अनधिकृत समजून जागेतून काढून टाकणेची नियमानुसार कारवाई करणेत येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मनिषा खत्री भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका,नाशिक